## थोडक्यात महत्त्वाचे...



### अमळनेर येथील श्री मंगळग्रह मंदिरात विद्याविनायक यागाची पूर्णाहुतीने सांगता

**अमळनेर** : येथील श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षीप्रमाणे श्री गणेश जयंती व वसंत पंचमीनिमित्त गुरुवारी (२२ जानेवारी) सकाळी श्री विद्याविनायक यागास प्रारंभ झाला होता. शुक्रवारी (२३ जानेवारी) दुपारी दोनला द्रौ. रा. कन्या शाळेच्या नऊ विद्यार्थिनींच्या हस्ते श्री विद्याविनायक यागाची पूर्णाहुतीने सांगता झाली. वसंत पंचमीनिमित्त श्री मंगळग्रह देवतेचा केशर जलाद्वारे अभिषेक करण्यात आला. सुरुवातीला स्थापित देवतांची प्रातःपूजा करण्यात आली. श्री गणेश व सरस्वती मातेचे ब्रह्मनस्पती सुक्त व मेधा सुक्त या यजुर्वेदीय सुक्तांनी अभिषेक करण्यात आला. त्यानंतर सरस्वती मातेला पांढऱ्या पुष्पाने अर्चन करण्यात आले. त्यानंतर एक हजार मंत्रांनी सरस्वती मातेस हवन कन्यांच्या माध्यमातून करण्यात आले. या कर्माची सांगतेसाठी मंगळग्रह सेवा संस्थेचे खजिनदार गिरीश कुलकर्णी व सचिव सुरेश बाविस्कर यांच्या हस्ते पूर्णाहूती पार पडली. त्यानंतर महाआरतीने श्री विद्याविनायक यागाची सांगता झाली. तुषार दीक्षित गुरुजी, प्रसाद भंडारी गुरुजी, वैभव लोकाक्षी गुरुजी, शुभम् वैष्णव गुरुजी, यश जोशी गुरुजी, परशुराम शर्मा गुरुजी यांनी पौरोहित्य केले.



### जे. टी. महाजन इंग्लिश स्कूलमध्ये संस्कार स्नेहसंमेलन

**यावल** : येथील जे. टी. महाजन इंग्लिश स्कूलमध्ये गुरुवारी (२२ जानेवारी) संस्कार स्नेहसंमेलन उत्साहात झाले. शाळेचे अध्यक्ष शरद जीवराम महाजन अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे उपाध्यक्ष लीलाधर चौधरी, तहसीलदार मोहनमाला नाझीरकर, आरती शरद महाजन, विश्वनाथ धनके, उत्पल चौधरी, रवींद्र पाटील, उल्हास चौधरी, ए. बी. महाजन, नितीन महाजन, प्रभाकर सोनवणे, जी. जी. वाघुळदे, शाकीर, सेमी माध्यमाच्या प्राचार्या रंजना महाजन, इंग्लिश माध्यमाच्या प्राचार्या दीपाली धांडे, प्रवीण झोपे, पर्यवेक्षिका राजश्री लोखंडे व गौरी भिरूड आदी उपस्थित होते. तहसीलदार नाझीरकर यांनी मनोगत व्यक्त केले. शरद महाजन यांनी मार्गदर्शन केले. स्नेहसंमेलनात कोळी नृत्य, नारी सन्मान, शेतकरी नृत्य, देवी स्तुती, सामूहिक नृत्य, देशभक्तिपर नृत्य, नाटिका असे विविध कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले. मनीषा पाटील व श्रद्धा बडगुजर यांनी सूत्रसंचालन केले. शिक्षिका प्रीती भार्गव यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी पर्यवेक्षिका गौरी भिरूड, राजश्री लोखंडे यांचे मार्गदर्शन लाभले.



### फैजपूरला सुभाषचंद्र बोस जयंतीनिमित्त कार्यक्रम

**फैजपूर (ता. यावल)** : 'तुम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी दुंगा' अशी हाक भारतवासीयांना देणारे स्वातंत्र्यसंग्रामातील आझाद हिंद सेनेचे संस्थापक अध्यक्ष स्वातंत्रसेनानी सुभाषचंद्र बोस यांची जयंती रामराज्य सेवाभावी संस्था व जयहिंद सैनिक संस्थेतर्फे साजरी करण्यात आली. याप्रसंगी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास निवृत्त फौजी भालचंद्र मेढे यांच्या हस्ते माल्यार्पण करून तसेच सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यास निवृत्त फौजी नीळकंठ अत्तरदे, भालचंद्र मेढे, कॅप्टन प्रा. राजेंद्रसिंह राजपूत, माजी नगराध्यक्ष पांडुरंग सराफ याच्यो हस्ते माल्यार्पण करून मानवंदना देण्यात आली. तत्पूर्वी, जम्मू-काश्मीरमधील दौड येथे जवानांचे वाहन खोल दरीत पडून १० जवान शहीद झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून जखमी झालेल्या जवानांना लवकर स्वास्थ्य लाभू देण्यासाठी प्रार्थना करण्यात आली. तद्नंतर नेताजींचे अवशेष जपानमधील टोकियो येथील रेनकोजी मंदिरात पुरले आहेत. ते मायदेशी परत आणण्यासाठी केंद्र सरकारने यशस्वी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची मागणीचे निवेदन प्रांताधिकारी कार्यालयात देण्यात आले, तसेच राष्ट्रपतींकडे रवाना केले आहे. याप्रसंगी संजय सराफ, निलेश चौधरी, व्ही. ओ. चौधरी, राजाभाऊ चौधरी, रवींद्र होले, विकास वाणी, विलास पाटील, कमलेज खिलोशिया, रमेश गलवाडे, दत्तात्रय चौधरी आदी उपस्थित होते.



### पारोळ्यात एनईएस गर्ल्सचे स्नेहसंमेलन उत्साहात

**पारोळा** : येथील एनईएस गर्ल्स हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन मिलिंद मिसर, उपनगराध्यक्ष ॲड. रोहन मोरे, उपाध्यक्ष केशव क्षत्रिय व गटशिक्षणाधिकारी विश्वास पाटील यांच्या हस्ते झाले. स्नेहसंमेलनात सामाजिक, सांस्कृतिक, देशभक्तिपर कार्यक्रम, लोकगीते व ग्रामीण जीवनाची प्रतिबिंब असलेली नृत्ये, मराठी भाषेतील गीते, जनजागृतीपर कार्यक्रम सादर करण्यात आले. विद्यार्थिनींचे स्नेहसंमेलन पाहून खऱ्या अर्थाने संस्कृतीचे रक्षण करत असल्याची जाणीव झाली व मुलींच्या सर्वांगीण विकासात स्नेहसंमेलनाने खरोखर भर पडेल, असे संस्थेचे चेअरमन मिलिंद मिसर यांनी सांगितले. शिक्षिकांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका एन. एम. मोरणकर, पर्यवेक्षक डी. जी. शिनकर, शिक्षक-कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. सचिन पाटील यांनी आभार मानले.

# बहिणाबाई महोत्सवाचे थाटात उद्घाटन
## जळगावकरांना लोककलांसह खाद्यपदार्थांची मेजवानी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २३ जानेवारी**

भरारी बहुउद्देशीय संस्था व क्रेडाई यांच्या वतीने करण्यात येत असलेल्या बहिणाबाई महोत्सवाचे उद्घाटन पद्मश्री चैत्राम पवार यांच्या हस्ते बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन करण्यात आले. या महोत्सवात खान्देशातील विविध लोककला, सत्यनारायण बाबा मौर्य यांचा भारत माता की आरती, हभप रविकिरण महाराज यांचे किर्तन, देशभक्तीपर गीते, वहीगायन, भावगीते, मराठी संस्कृतीचा फॅशन शो, लोककलांबरोबरच शालेय व महाविद्यालयीन कलावंत पाच दिवस आपली कला सादर करणार आहेत. खाद्यपदार्थ आणि विविध गृहपयोगी वस्तूंचे स्टॉल्स याठिकाणी असून पहिल्या दिवशी नागरिकांचा मोठा प्रतिसाद होता.

**खेळ पैठणीचा, रांगोळी स्पर्धेने सुरूवात**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला खेळ पैठणीचा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच मेहंदी स्पर्धा झाली. चैत्राम पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. खासदार स्मिता



वाघ यांनी बहिणाबाई महोत्सवाच्या ११व्या पर्वाला शुभेच्छा दिल्या. आमदार सुरेश भोळे, उद्योगपती रजनीकांत कोठारी, माजी आमदार मनिष जैन, अनिकेत पाटील,अनिश शहा, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या उपाध्यक्षा संगीता पाटील, दिपक सराफ, नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक अमित तायडे, श्रीराम पाटील, डॉ. पी. आर. चौधरी, शैलेश मोरखडे, नगरसेवक दिपक सुर्यवंशी, जयश्री राहुल पाटील, माधुरी बारी, सागर पगारीया, अक्षय सोनवणे, रितेश लिमडा, विक्रांत चौधरी, पवन जैन, सागर परदेशी यांची उपस्थिती होती. सुत्रसंचलन विनोद ढगे यांनी तर दीपक परदेशी यांनी प्रास्ताविक केले. विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके वितरण करण्यात आली. उद्यापासून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीं व संस्थांना मान्यवरांच्या हस्ते बहिणाबाई पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. उद्योग व शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल पुखराज पगारीया व निळकंठ गायकवाड यांना जीवनगौरव पुरस्काराने तसेच प्राचार्य मानसी गगडाणी यांनी शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल बहिणाबाई पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



### धरणगाव महाविद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात

**धरणगाव** : येथील कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन इंद्रधनुष्य २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन प.रा.हायस्कूल सोसायटीचे अध्यक्ष डॉ.अरुण कुलकर्णी यांनी केले. प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सचिव डॉ. मिलिंद डहाळे, संचालक नीनाताई पाटील, अजय पगारिया, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय एस.जगताप, उपप्राचार्य डॉ. व्ही.ए.वारडे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उप प्राचार्या प्रा.आर.पी.चौधरी, विद्यापीठाच्या आधीसभा सदस्या डॉ. के.डी. महाजन, समन्वयक प्रा.एस. एस.पालखे, पर्यवेक्षक प्रा. एस.आर. अत्तरदे, कार्यालयीन अधीक्षक रितेश साळुंखे, वरिष्ठ विभागाचे स्नेहसंमेलन प्रमुख डॉ.स्वप्निल म.खरे, कनिष्ठ विभागाचे स्नेहसंमेलन प्रमुख प्रा.एम. एस. कांडेलकर हे उपस्थित होते.

बक्षीस वितरणासाठी खानदेशी अभिनेत्री श्रीमती पुष्पाताई ठाकूर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०२५- २६ चा अहवाल प्राचार्य डॉ.उदय एस.जगताप यांनी सादर केला तर कार्यक्रमाची प्रस्तावना आणि आभार प्रदर्शन स्नेहसंमेलन प्रमुख डॉ.स्वप्निल म.खरे यांनी केले.

सकाळच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले, ज्यात महाविद्यालयाच्या कनिष्ठ आणि वरिष्ठ विभागाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. तर दुपारच्या सत्रात शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये विविध क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी केलेल्या महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांचा आणि विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गौरव जी. महाजन, प्रा.पी.सी.साळवे, डॉ.सुषमा तायडे,डॉ.नेत्रा उपाध्ये यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी म हाविद्यालयाच्या सर्व कनिष्ठ व वरिष्ठ विभागाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# माँसाहेब जिजाऊ पतसंस्थेतर्फे धरणगावात नारीशक्तीचा सन्मान

**हळदी-कुंकू कार्यक्रमात नगरसेविकांचा सत्कार**

**तभा वृत्तसेवा**
**धरणगाव, २२ जानेवारी**

येथील माँसाहेब जिजाऊ महिला पतसंस्थेतर्फे रविवारी (१८ जानेवारी) वाणी मंगल कार्यालयात हळदी-कुंकवाचा कार्यक्रम उत्साहात झाला. याप्रसंगी पतसंस्थेतर्फे नारीशक्तीचा सन्मान करण्यात आला. शहरातील नगरसेविकांचा विशेष सत्कारही करण्यात आला.

सुरुवातीला माँसाहेब जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. बालकवी ठोंबरे विद्यालयाच्या संचालिका शोभाताई चौधरी, हरिभक्त परायण विद्याताई येवले, लोकनियुक्त नगराध्यक्षा लीलाताई चौधरी, उपनगराध्यक्षा सुरेखा महाजन प्रमुख पाहुण्या होत्या. पतसंस्थेच्या चेअरमन योगिता वाणी, व्हाइस चेअरमन चंद्रकला भोलाणे व संचालिकांची उपस्थिती होती.

चेअरमन योगिता वाणी यांनी प्रास्ताविकात, संस्थेचे उद्दिष्ट, महिला सबलीकरण व औद्योगिक महिला व्यवसायांना प्रोत्साहन देणे आहे. संस्थेची स्थापना सहा महिन्यापूर्वी झाली असून, संस्था प्रगतिपथावर आहे, असे नमूद केले. संस्थेने आतापर्यंत ७० लाखांच्या ठेवी मिळविल्या असून, कर्जवाटप ५० लाख रुपये झाले आहे. महिला सभासद, ठेवीदार, कर्जदार यांच्याम ुळे संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

याप्रसंगी लोकनियुक्त नगराध्यक्षा लीलाताई चौधरी, उपनगराध्यक्षा



सुरेखा महाजन, नगरसेविका मंदाकिनी येवले, अंजली विसावे, भारती महाजन, हेमांगी अग्निहोत्री, सोनाली कंखरे, मीना चौधरी, प्रमिला शिरसाठ, ज्योती पाटील, अक्काबाई चव्हाण, कविता पाटील, रूपाली देवरे, प्रियंका जाधव यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

शोभाताई चौधरी यांनी, म हिलांनी मुलांना शिक्षणासोबत संस्कारही देण्याची गरज आहे, असे सांगितले. संचालिका डॉ. निधी यांनी महिला सबलीकरणाचे महत्त्व पटवून दिले. संचालिका प्रा. निर्मला पवार यांनी संस्थेचे महत्त्व पटवून दिले. नगराध्यक्षा चौधरी, अंजली विसावे, पूनम येवले, मोरे यांनी म नोगत व्यक्त केले.

पतसंस्थेचे व्यवस्थापक प्राज्वल सोनार यांनी छोटी बचत उद्याचे भविष्य माध्यमातून संस्थेने पाच वर्षांसाठी चालू केलेल्या योजनेचे महत्त्व सांगितले. संस्थेच्या पिग्मी एजंट गिरिजा वाणी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी संचालिका शीतल केले, अनिता मेहेर, डॉ. निधी अमृतकर, डिंपल चौधरी, स्वाती महाजन, वैशाली सोनार, मनीषा पाटील, सोनाली कंखरे, निर्मला पवार, पिग्मी एजंट देवश्री महाजन, मीना कोतकर यांनी सहकार्य केले. हळदी कुंकू कार्यक्रमप्रसंगी हरिभक्त परायण विद्याताई येवले यांनी संस्थेवर भारुड म्हणून सर्वांना मंत्रमुग्ध केले. स्वाती महाजन यांनी आभार मानले.

# रेल्वे कर्मचाऱ्याला लाच घेताना मध्य रेल्वे दक्षता पथकाने पकडले

**भुसावळ** : मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाने तोतया रेल्वे दक्षता अधिकाऱ्याला पकडले, जो रेल्वे कर्मचाऱ्याकडून पैसे मागत होता. संशयित हरीश कांबळे यांनी रेल्वे बोर्ड दक्षता निरीक्षक असल्याचा भासवून तक्रारदाराकडून वीस हजारांची लाच घेताना पकडला गेला.

माहितीनुसार, हरीश कांबळे यांनी मुंबईतील कार्यालयातून प्रलंबित पैसे भरण्याचा बहाणा करून तक्रारदाराकडून ही रक्कम मागितली होती. यापूर्वीही संशयितावर ६० हजारांची लाच मागण्याचा आरोप होता, ज्यासाठी ऑनलाइन व्यवहाराचा प्रयत्न झाला; पण पैसे हस्तांतरित झाले नाहीत. तक्रारदाराने गैरप्रकाराचा संशय आल्यावर मध्य रेल्वे दक्षता पथकाशी संपर्क साधला आणि २२ जानेवारी २०२६ रोजी कल्याण रेल्वेस्थानकात छापा टाकून सापळा रचण्यात आला. या कारवाईत हरीश कांबळे यांना भारतीय दंड संहिता २०२३ (बीएनएस) कलम ३१८(२) आणि ३१९(२) अंतर्गत



फसवणूक आणि तोतयागिरीसाठी गुन्हा दाखल करण्यात आला. या कलमानुसार तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा दंड आणि पाच वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. मध्य रेल्वेने पुन्हा एकदा भ्रष्टाचाराविरुद्ध शून्य सहनशीलतेची आपली वचनबद्धता दर्शवली असून, रेल्वे कर्मचाऱ्यांना आणि जनतेला सतर्क राहण्याचे व अशा कोणत्याही फसव्या कृतीची तातडीने तक्रार करण्याचे आवाहन केले आहे.


**THE INSTITUTE OF CHARTERED ACCOUNTANTS OF INDIA**
**(Set up by an Act of Parliament)**
Head Office: ICAI Bhawan, Indraprastha Marg, New Delhi – 110 002.
Branch Office: Jalgaon Branch of WIRC of ICAI, Plot, No. 10, Gajanan Colony, Ring Road, Jalgaon.
Email : jalgaon@icai.org, Contact : 0257-2224305

**NOTICE INVITING TENDER**

ICAI invites unconditional sealed tender in two bid system (Technical bid and Price bid in two separate covers) from eligible, experienced and reputed Bidder/contractor for **RENOVATION/CIVIL, INTERIOR & FURNISHING WORKS for Jalgaon Branch of WIRC of ICAI at ICAI Bhawan, -Plot No. 10, Gajanan Colony, Ring Road, Jalgaon, M.S. – 425 001.**
Work described in the Tender document in detailed is available at ICAI website www.icai.org, www.wirc-icai.org & Jalgaon Branch Premises. **The last date of submission of duly filled in Bids is 31/01/2026 up to 2:00 PM.**

**Secretary, ICAI**



महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहिर निवेदन**

**अ) दिनांक 24.01.2026** रोजी खालील उपकेंद्रातून उर्जान्वित होणाऱ्या खालील 33 केव्ही व 11 केव्ही वीज वाहिनी वरील वीजपुरवठा नमूद केलेल्या कालावधीत खंडित राहणार आहे. सर्व वीज ग्राहकांनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे. तसेच काम पूर्ण झाल्यावर विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यात येईल.

| अ. क्र. | उपकेंद्राचे नांव | वीजपुरवठा खंडित असण्याची दिनांक | प्रभावित होणाऱ्या 33 व 11 केव्ही वाहिनी चे नांव | कालावधी | प्रभावित गावे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 33/11 केव्ही किन्ही उपकेंद्र | 24.01.2026 | 33/11 केव्ही Power Transformer 1 आणि 2 | सकाळी 09.00 ते दुपारी 15.00 (एकूण 6 तास) | 33/11 किन्ही MIDC उपकेंद्रातून वीजपुरवठा होणाऱ्या सर्व वाहिन्यावरील किन्ही, कन्हाळे बु. आणि खु., खडका गाव व शेती परिसर , किन्ही MIDC संपुर्ण परिसर, शिवपूर कन्हाळे रोड परिसर |

PRO NO. JLGZ/198/2025-26

**कार्यकारी अभियंता**
**शवग्रा विभाग भुसावळ.**



MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-Tender Notice**

Online tender is invited in two bids as detailed below.

| Sr. No. | Tender No. | Name of Work | EMD / Est. Value In Rs. | Sale Period / Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | T-24/ 3000065222/ 2025-26 | **Name of Work :-** Work of Transplantation of trees which are fouling in the proposed BoP Road Y-Point to Urjabhavan at KTPS, Koradi. | EMD Rs. 29,500/- ------------------ Rs. 29,46,300.00 | 24.01.2026 T0 31.01.2026 upto 17.30 hrs. / 02.02.2026 upto 12.00 hrs. |

*E-Tender Cost will be Rs.1180/-*
1. *For further details pertaining to the above tender is available on website www.eprocurement.mahagenco.in*
2. *Any amendment to this notice and or notification of amendment in bidding document shall be notified on website www.eprocurement.mahagenco.in only. Potential bidders are requested to take note of the same.*
3. *Agencies are requested to register themselves for E-Tenders.*

**Note : Vendors are advised to submit the bids well in advance of last date of submission. The E-Tender sale date and submission date will not be extended in any case.**

**Dy. Chief Engineer (Civil),**
**Civil Construction Circle,**
**M.S.P.G.C.L., KORADI.**



**त्वरित पाहिजेत**
**मोफत नोकरी / प्रशिक्षण**

- आवश्यकता : **WILP TRAINEE**
- पात्र उमेदवार : **मुले व मुली**
- वयाची अट : **18-28 वर्षे**
- सुविधा : **बस आणि कँटीन सुविधा उपलब्ध**
- पात्रता : **किमान 12वी. पास, ITI सर्व ट्रेड फक्त (सुतार, प्लंबर, COPA सोडून)**
- स्टायपेंड : **RS. 18,055 + 1000** (उपस्थिती बोनस रु. प्रती महिना)
- त्वरित भेटा : **ऑफिस क्रमांक - 49 आणि 50, पहिला मजला कॅपिटल सिटी, महिंद्रा अँड महिंद्रा गेट क्रमांक - 01 समोर, चाकण एमआयडीसी फेज-4, निघोजे, ता. खेड, जिल्हा पुणे – 410505**

DMCFS PVT. LTD.

**7391087483 / 8669607330**



Late Dagdabai Champalalji Biyani Shaikshanik Vikas, Bhusawal
**BIYANI B.ED. COLLEGE**
**(English Medium)**
Jamner Road, Near Govt. ITI Bhusawal Dist. Jalgaon 425 201, Ph. (02582) 242010, 242015

**APPOINTMENT**

Application are invited for the following Permanent Non-Granted Full Time Post from the eligible candidate.

| Sr. No. | Designation | Subject | No. of Post | Category | Nature of Post |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Principal | ----- | 1 | Isolated | Permanent Non-Granted |
| 2 | Assistant Professor | Perspective in Education | 2 | SC-1, Open -1 | Permanent Non-Granted |
| 3 | Assistant Professor | Pedagogic (Mathematics, Social Science) | 2 | SC-1, VJ-A-1 | Permanent Non-Granted |

Eligibility and qualification details are available on college website **www.biyanicollegeofeducation.com** & University website **www.nmu.ac.in** Eligible candidate should submit their application within 15 days from the date of publication of this advertisement on below address: Chairman/Principal Biyani College of Education, Mirghavan Shivar, Jamner Road, Near Govt ITI, Bhusawal, Dist. Jalgaon. MH.425201.

**President**
**Mr. Manoj B. Biyani**

**Secretary**
**Dr. Sangita M. Biyani**



MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.
**Maharashtra State Power Generation Comp. Ltd.**
**Bhusawal Thermal Power Station, Bhusawal.**

**E-AUCTION NOTICE**

EXTENSION TO Notice for e-Auction **Sale of ESP Dry Fly Ash (20% quota)** to SSI Units at Bhusawal TPS.
MAHAGENCO is looking for firms willing to purchase the ESP Dry Fly Ash (20% quota) at Unit 4 and 5 of 2*500 MW of Bhusawal Thermal Power Station by way of e-auction sale.

| | |
|---|---|
| Estimated quantity (MT) | **2.19 LMT** |
| Estimated Rate (Rs/MT) | Rs. 221/- |
| Earnest Money Deposit (EMD) | Rs. 10,000/- |
| Period of Registration with MSTC, Uploading of documents, EMD payment | 02.01.2026 TO 31.01.2026 |
| Scrutiny of Documents | 02.02.2026 TO 11.02.2026 |
| Deviation / Error correction in Documents | 16.02.2026 TO 20.02.2026 |
| Uploading list of qualifying agencies | As per auction catalogue |
| Date and Time of e-Auction | As per auction catalogue |
| Key Contact Personnel & Contact details: | |
| Auctioneers for MSPGCL (for queries related to registration with e-auction portal, transfer of payments) | M/s. MSTC Ltd., Mumbai **REGISTRATION RELATED QUERIES:** 1. Mr. Manas Mallick, Chief Manager Tel: 02269856818, 9831108435 e-mail: wroopn2@mstcindia.in **AUCTION RELATED QUERIES:** 1. Mr. Shishupal Yadav, Mobile: 8826562675 e-mail: wroopn6@mstcindia.in mstc.akshay@gmail.com 2. Mr. Ganesh Sawant, Mobile: 9193969095 1. 1. e-mail: wroopn14@mstcindia.in |
| Bhusawal TPS (for queries related to site visit, material, contract execution, deliveries, invoices) | Mr. S. V. Mane, Exe. Eng. (Ash Utilization), Bhusawal TPS, Deepnagar 9860338328 eebtpsmahagams@mahagenco.in |

Further details are available on **www.mstcindia.co.in**, **www.mstcecommerce.com**, **www.mahagenco.co.in/auction/list of e-auction**